# प्रकरण चौथे

# जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम व राजकीय आरक्षणाची सैध्दांतिक मांडणी

## ४.१. जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम :—

राजकीय आरक्षणाची सैध्दांतिक मांडणी करण्यासाठी जाती व्यवस्थेचा अर्थ आणि उगम जानुन घेणे महत्वाचे आहे. म्हणुन बाबासाहेब आंबेडकर, इरावती कर्वे, एम. एन. श्रीनिवास, वगैरे. विचारवंतानी जाती व्यवस्थेच्या केलेल्या मांडणीचा अभ्यास प्रकरणाच्या या भागात केला आहे.

भारतामध्ये हिंदू धर्मात असलेली जाती व्यवस्था व जातीचा उगम यात विचारवंतामध्ये मतभिन्नता आढळते. पहिला मतप्रवाह आढळतो तो जाती व्यवस्थेची निर्मिती ही वर्ण व्यवस्थेपासून व वर्णव्यवस्था ही आर्यांच्या आक्रमणापासून आली असे मानतो. तर दुसरा मतप्रवाह हा हिंदूधर्मातील 'वेदा' पासून झाली असे मानतो तर तिसरा प्रवाह हा या विचार प्रवाहांना काहीसा दुजोरा देत माणवी वर्तणातून झाली असे मानतो.

पहिला मतप्रवाह आणि दुसरा मतप्रवाह यांच्यामध्ये थोडेफार साम्य आढळते कारण, दोघेही जातीव्यवस्था हे वर्णव्यवस्थेचे अपत्य आहे असे माणतात मात्र पहिल्या मतप्रवाहानुसार आर्यांनी भारतात आक्रमण केल्यानंतर ही वर्ण व्यवस्था अस्तित्वात आली व आर्य हे परके व अनार्य हे मुळचे आहेत आर्य रंगाने गोरे तर अनार्य रंगाने काळे म्हणून शुद्र हे अनार्य म्हणजे मुळचे आहेत तर ब्राम्हण, वैश्य, क्षत्रिय हे आर्य

म्हणजेच परके आहेत. तांत्रिक दृष्टया हे पटणारे नाही. कारण जर ब्राम्हण, वैश्य, क्षत्रिय  हे आर्य असतील तर मग त्यांच्यामध्ये भेदभाव कसा? दुसरा विचार प्रवाह येतो हिंदू धर्मामधील वेदावर आधारीत या प्रवाहात दोन प्रकारचे विचार आढळतात. पहिला शुद्राची उत्पत्ती ही शैताना पासून आणि ब्राम्हणांची उत्पत्ती ईश्वरापासून झाली असे मानणारा. या विचार प्रवाहावरती प्रश्न पडतो की क्षत्रिय आणि वैश्य यंची उत्पत्ती शैतान किंवा ईश्वरापासून न होता आपसात कशी झाली? यातला दुसरा विचार प्रवाह म्हणजे चार वर्णाची उत्पत्ती ब्रम्हापासून झाली. मुखातून ब्राम्हण जन्मले, भुजामधून क्षत्रिय, नाभीमधून वैश्य तर पायाच्या नाखामधून शुद्र जन्मले व या वर्णव्यवस्थेचे विकसित रूप म्हणजे आजची जाती व्यवस्था आहे. हा विचार प्रवाह विज्ञानाच्या कसोटीत तपासून पाहिल्यास विश्वासहार्य वाटत नाही. तरीही या दोनही प्रवाहामध्ये केवळ वर्णव्यवस्थेच्या निर्मितीचे स्वरूप वेगळे आहे.

तिसरा मत प्रवाह यापेक्षा वेगळा आहे जो वर्तनवादी सिध्दांतावर भर देतो. मनुष्याच्या उत्क्रांतीनुसार त्याच्या वर्तनात होत गेलेले बदल यातून वर्णव्यवस्था अस्तित्वात आली आहे या प्रवाहातील विचारवंत म्हणतात, बुध्द तत्वज्ञानानुसार जेव्हा माणसाची उत्क्रांती होत होती व मनुष्य कुटुंबव्यवस्थेचा भाग बनला. त्यानंतर ज्यामध्ये मोह, मत्सर, स्वार्थ या अवगुणांचाही विकास झाला. दुसऱ्याची संपत्ती हस्तगत करणे, चोरी करणे, दरोडा घालणे इत्यादी अवगुणांचा विकासही माणसामध्ये झाला. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती स्वत:ला असुरक्षित समजू लागली व सुरक्षिततेची

गरज भासू लागली तेव्हा राज्यातील सर्व नागरीक एकत्र आले व त्यांनी संरक्षणासाठी एक 'वर्ग' नेमला व त्याला ते आपल्या उत्पादनातील काही भाग देऊ लागले त्याबदल्यात हा 'वर्ग' त्यांना सुरक्षा पूरवु लागला. योग्य, अयोग्य, न्यायदानाचे कार्यही करू लागला. याप्रकारे ''मनु'' या पदाची निर्मिती झाली व क्षत्रिय हा वर्ग उदयाला आला. पुढे याच प्रकारचे कार्याचे विभाजन होऊन तीन वर्ण अस्तित्वात आले ते म्हणजे ब्राम्हण, वैश्य, शुद्र. पूर्वी ही वर्णव्यवस्था कार्यावर आधारीत होती मात्र नंतरच्या काळात ही व्यवस्था जन्मावर आधारीत झाली. याच वर्णव्यवस्थेचे विस्फोटक रूप म्हणजे आजची जातीव्यवस्था आहे.

या तीनही विचार प्रवाहामध्ये तिसरा विचार प्रवाह तांत्रिक दृष्टया विश्वासहार्य वाटतो.

**जातीचा अर्थः—**

खालील काही विचारवंतांनी जातीच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

१. डॉ. केतकर यांच्या मते, ''ज्या विशिष्ट संघामध्ये प्रवेश जन्मानेच होतो आणि दुसऱ्या कोणत्याही कारणाने होत नाही व ज्या संघातील लोकांस त्या संघाबाहेरील लोकांशी लग्न करता येत नाही त्या संघास जाती असे म्हणतात.''

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ''जात हो एक बंदिस्त वर्ग आहे, भारतीय समाजामध्ये जातीची जी उतरंड व्यवस्था निर्माण झाली आहे ती एका उतरंडीवरून दुसऱ्या उतरंडीवर जाता येत नाही.''

३. इरावती कर्वे यांच्या मते, ''विवाह हा फक्त जातीच्या आतच होतो, जातीचा विस्तार हा एका मर्यादित भागात बहुधा एकभाषिक भागात होतो, जातीचे इतर जातीशी उच्च अथवा निच असे कमी अधिक स्थान असते आणि इतर जातीशी तीने कसे वागावे याची परंपरा असते.''

साधारणपणे भारतामधील जातीव्यवस्थेचा अर्थ आणि उगम पाहीला असता ही जाती व्यवस्था पूर्णपणे विषमतेवर आधारित आधारलेली दिसते. याच कारणाने ज्या जाती शेकडो वर्षे या परंपरेच्या बळी ठरल्या, त्या जातीचा विकास व्हावा, त्या मुख्य प्रवाहात याव्यात म्हणून जातीच्या आधारावरती आरक्षणाची निर्मिती करण्यात आली. म्हणून मला माझ्या विषयाचे संशोधन करतांना भारतामधील जातीव्यवस्थेचा उगम व त्याचा अर्थ याचे विवेचन करणे महत्वाचे वाटले.

## ४.२) राजकीय आरक्षणाची सैध्दांतिक मांडणी

प्रबंधाच्या या भागामध्ये आरक्षण व्यवस्था निर्माण होण्यामागे कोणकोणते विचारप्रवाह कारणीभूत आहेत. कोण–कोणत्या सिध्दांतामधून ही व्यवस्था विकसित झालेली आहे. याचे विवेचन करत असतांना प्रामुख्याने मार्क्सवादी सिध्दांत, उदारमतवादी सिध्दांत, समतेचा सिध्दांत, आरक्षणाचा समाजशास्त्रीय सिध्दांत हे सिध्दांत महत्वाचे ठरतात.

### ४.२.१) मार्क्सवादी सिध्दांतः—

राजकीय आरक्षणाची व्यवस्था मार्क्सवादी सिध्दांतामधून पाहत असतांना यात प्रामुख्याने दोन विचार प्रवाह दिसतात पहिला ज्यात विकसित डाव्यांचा समावेश होतो उदा. CPI-CPM आणि दुसरा ज्यात म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गेल ऑम्वेट वगैरे यांचा समावेश होतो.

पहिल्या विचारप्रणालीमध्ये इरफान हबीब, जावेद आलम, इजाज अहमद, आर. एस. शर्मा यासारख्या विचारवंतांचा समावेश होतो. या विचारवंतांमध्ये जात आणि वर्ग यात गुंतागुंत आढळून येते. हे विचारवंत जातीचे नेमके स्थान काय हे निश्चित करू शकले नाहीत. इरफान हबीब त्यांच्या *Introduction: Marxs perception of India* या लेखात म्हणतात त्यांना मार्क्सचे *Ethnologic note book* हे मुळ पुस्तक वाचण्यासाठी प्राप्त झाले नाही. यामुळे त्यांची जात आणि वर्ग यांच्यातील गुंतागुंत आहे.

शरद पाटील हे पहिल्या विचारप्रणालीवर टिका करतात व यातून त्यांनी सत्यशोधक कम्युनिष्ट चळवळ सुरू केली (Sharad Patil- *Caste feudal servitale*, Mavlai Prakashan- 2006).

प्रा. मर्झबान जाल असे म्हणतात केवळ युरोप ज्ञान पूरवू शकतो ही धारणा चूकीची आहे. ते त्यांच्या *Asiatic Mode of Production* मध्ये

म्हणतात भारतात भौगोलिक, सामाजिक, आर्थिक विषमता आहे आणि भारतातील उत्पादन व्यक्तीही जातीवर अवलंबून आहे.

जातीव्यवस्थेमुळे भारत हा अविकसित देश आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हिंदूत्व हा एक नैतिक शिकवन देणारा धर्म असू शकत नाही जसे बौध्द, ख्रिश्चन, मुस्लिम धर्म आहेत. मार्क्स त्याच्या लेखामध्ये म्हणतात हिंदूत्व ही एक अशी विचारप्रणाली आहे की ज्यात जाती हया बंधक आहेत. ज्यात लोक केवळ स्वत:च्या वैयक्तिक संपत्तीचा विचार करतात. ज्यात लोक माणूस आणि माणूसकिला मानत नाहीत पण Hanuman the Monkey व Sabala the Cow याच्यावर गुडघे टेकतात.

मला वाटते की विकसित डाव्या विचारप्रणालीचे विचारवंत उदा. इरफान हाबीब, आर. एस. शर्मा वगैरे हे मार्क्सच्या या विचाराकडे दुर्लक्ष करतात. आणि केवळ युरोपीयन मॉडेल ऑफ क्लास ज्यात समाज केवळ दोन वर्गात विभागतो. पहिला भांडवलदार व दुसरा कामगार यांचा स्विकार करतात जे भारताच्या वास्तवाला समजू शकत नाहीत.

मी प्रयत्न करतोय की, मार्क्सचे Ethnologic Book समजून घेऊन त्याचे विश्लेषण कसे करता येईल.

याआधारे आपल्याला मार्क्सची थेरी ऑफ रिझर्वेशन चा विचार करता येईल. मार्क्सवादी सर्व विचारवंत इरफान हाबीब, गेल ऑम्वेट, गोपळ गुरू, आर. एस. शर्मा सर्वजन मानतात की, सामाजिक व राजकीय दोन्ही प्रकारचे आरक्षण असले पाहिजे.



Jayakar Knowledge Resource Centre
SPPU, Pune

मला वाटते की मार्क्सीस्ट थेरी खूप प्रबळ आहेत. मार्क्सवादी सिध्दांत हे एक भांडवलशाही तत्वज्ञान आहे. जो समानता निर्माण करू शकतो असमानता नष्ट करू शकतो खरी समानता आणण्यासाठी जातीवर आधारीत उत्पादन व्यवस्था तोडली पाहिजे. जे बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या जातीसंस्थेचे उच्चाटन मध्ये म्हणतात. आणि हे तोडण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता असली पाहिजे त्यासाठी १) शेतजमीनीचे राष्ट्रीयकरण २) औद्योगिक राष्ट्रीयकरण ३) कॉमन स्कूल:— कॉमन स्कूलच्या माध्यमातून समाजातील सर्व जातीधर्माचे लोक एकत्र शिक्षण घेतील, एकत्र राहतील, एकत्र जेवन करतील, कॉमन स्कूलचा कार्यक्रम जे. पी. नाईक यांनी सुरू केला होता. आनंद तेलतुंबडे म्हणतात की, जर जातीयता नष्ट करायची असले तर कॉमन स्कूल सूरू केले पाहिजे.

मार्क्स आणि बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, लोकशाही तीन प्रकारची असते १) राजकीय लोकशाही २) सामाजिक लोकशाही ३) आर्थिक लोकशाही.

म्हणून या तिनही प्रकारची लोकशाही यशस्वी होण्यासाठी आरक्षण खूप महत्वाचा घटक आहे.

### ४.२.२) उदारमतवादी सिध्दांत:—

ही एक राजकीय विचारप्रणाली आहे हा विचार प्रवाह युरोप मध्ये जमीनदार वर्गाच्या विरोधात विकसित झाला होता. युरोपामध्ये जमीनदार आणि पोपची मक्तेदारी वाढली होती.

याच्या विरोधात *Age of anlightment* याची सुरूवात झाली. या युगात उदारता आणि समता या विचाराची सुरूवात झाली जी बोलण्याचे स्वातंत्र्य, राजकीय लोकशाही, खुला बाजार या विचारावर आधारलेली होती.

१७ व्या शतकात जॉन लॉक ते इंग्लंड मध्ये या विचाराची सुरूवात केली. यात दोन विचार प्रणाली होत्या. १) जिविताचा हक्क २) संपत्तीचा हक्क. जॉन लॉक नंतर १९ व्या शतकात जे. एस. मिल याने एक पुस्तक लिहिले (Libarty) ज्या विचाराने फ्रान्स आणि अमेरिकेत क्रांती झाली.

उदारता ही समतेला मानणारी होती मात्र ती भांडवलशाही जोडली गेल्याने केवळ औपचारिक समता अस्तित्वात होती प्रत्यक्षात समता नव्हती. यात खुप गुंतागुंत होती.

भारतात १८५७ चा उठाव हा याचा विचारापासून प्रेरित होऊन आला यातून मध्यम वर्गाचा उदय झाला व याच विचारप्रणालीवर कॉंग्रेस पक्षाचा उदय झाला ज्याने ब्रिटीश साम्राज्यवादाशी लढा दिला. याच विचारलणालीवर 'इंडीयन इंडस्ट्रियल कॅपिटालिस्ट' सुरू झाली. भारताच्या संसदीय लोकशाहीचा आधार सुध्दा हीच विचारप्रणाली आहे.

आपण जेव्हा या सर्व विचारांचे विश्लेषण करू तेव्हा समजते की, समता ही केवळ औपचारिकता राहते. वास्तविक पाहता ही असमानता कायम असते. म्हणून आरक्षण व्यवस्थेत वास्तविक पाहता असे दिसत नाही.

### ४.२.३) आरक्षणाचा समाजशास्त्रीय सिध्दांतः—

इम्यनुअल वेलस्टाईन, अंडरे गुंदर, फ्रान्क, समीर अमीन या विचारवंतांनी जागतिक व्यवस्था सिध्दांत आणि परावलंबन सिध्दांताचे विवेचन कण्याचा प्रयत्न केला आहे. यात एकूण ४ घटकांपैकी *Center* आणि *Periphery* हे दोन प्रमुख घटक मानले आहेत. युरोप, अमेरिका यासारखे राष्ट्र *Center* मध्ये आहेत तर आशियाई राष्ट्र *Periphery* मध्ये आहेत. *Periphery* राहून *Center* वर अवलंबून आहेत. हे त्याला कच्चा माल व मनुष्यबळ पुरवितात आणि *Center* त्यावर प्रक्रिया करून तोच माल अधिक किंमतीने *Periphery* ला पुरवितो व या दोन गटामधील दुरावा अधिक—अधिक वाढत जातो *Periphery* मधील राष्ट्र कधीही *Center* चा भाग होऊ शकत नाहीत कारण त्यांचे परावलंबने कधीही संपत नाही.

हाच सिध्दांत अनुसूचित जाती व खुला गट यांना लागू केला तर अनुसूचित जाती खुल्या गटाला मनुष्यबळ पुरवितो त्याचा बदल्यात त्यांना काही मोबदला मिळतो. पण उत्पादन व नफा यावर खुल्या गटाचीच मालकी असते. ते अधिकाधिक श्रीमंत होतात व अनुसूचित जाती आणि खुला गट यांच्यातील विषमता कधीही दूर होऊ शकत नाहीत म्हणून या जातींना आरक्षणाची गरज आहे.